# समानुभूति

## २४ जून, २०२२

### अमी बन्सल आणि गरिमा बोरवणकर यांच्याद्वारे लिखित भाष्य

### भाग १

सर्वाधिक ‘आनंदाचा,’ दिवस—२४ जून—याचे आपल्या हृदयांत आणि सर्व सिद्धयोग्यांच्या हृदयांत एक अनुपम व अतिप्रिय असे स्थान आहे. तो आहे, आपल्या परमप्रिय श्रीगुरू, गुरुमाई चिद्विलासानंद यांचा जन्मदिवस!

सिद्धयोग मार्गावर, श्रीगुरुमाईंच्या जन्मदिवसाच्या सन्मानार्थ संपूर्ण जून महिना ‘आनंदमय जन्मदिवस’ या स्वरूपात साजरा केला जातो. श्रीगुरुमाईंकडून आपण एक मुख्य शिकवण ही शिकलो आहोत की, आपले खरे सारतत्त्व आहे विशुद्ध आनंद, आणखी काहीही नाही, आणि या ग्रहावर असताना आपल्यासाठी हे अत्यावश्यक आहे की, आपण त्याला ओळखावे व त्याची अनुभूती करावी. ‘आनंदाचे डोही, आनंद तरंग,’ या अभंगात संतकवी तुकाराम महाराज म्हणतात, “आनंदाच्या महापूरात लाटा उसळत आहेत आणि त्यासुद्धा आनंदच आहेत, कारण आनंदाच्या या देहाच्या प्रत्येक कणाचे स्वरूप हे आनंदच आहे!”

जसे की, तुमच्यापैकी अनेक लोक जाणतात, संपूर्ण जून महिन्यादरम्यान सर्व सिद्धयोग्यांना व नवीन साधकांना श्रीगुरुमाईंकडून दररोज एक सद्‌गुण प्राप्त होतो. श्रीगुरुमाईंनी वर्ष २०१३मध्ये या परंपरेची सुरुवात केली होती. आपल्यापैकी जे लोक या परंपरेविषयी जाणतात, ते प्रत्येक वेळी जून महिन्यात याची प्रतीक्षा करतात आणि आपल्या असे लक्षात येते की, जसजसे आपण या सद्‌गुणांचे अध्ययन करत जातो आणि त्यांच्या सारतत्त्वाला आपल्या अंतरी आत्मसात करत जातो, तसतसा याच सद्‌गुणांचा एक नवीन अर्थ प्रकट होऊ लागतो. याच दरम्यान, नवीन साधक पहिल्यांदा हे शिकतात की, सिद्धयोग मार्गावर या सद्‌गुणांचा अर्थ काय आहे व त्यांचे महत्त्व काय आहे आणि ते या सद्‌गुणांशी निगडित अनेक विस्मयकारक अंतर्दृष्टींचा शोध लावतात.

आणि मग, २४ जूनला, प्रत्येक वर्षी, आपल्याला गुरुमाईंकडून जन्मदिनाचे एक सरप्राइझ्‌ मिळते. जन्मदिन सरप्राइझ्‌शिवाय जन्मदिन महोत्सव कसा साजरा होईल, हो ना? विशेषतः, जेव्हा एखाद्या

व्यक्तीचा जन्मदिन असतो, तेव्हा इतर सर्व लोक *त्या व्यक्तीला* भेटवस्तू देतात. म्हणून, ही गोष्ट खूप खास आहे की, गुरुमाईंच्या जन्मदिनी, वर्षानुवर्षे, त्या *आपल्याला* एका सद्गुणाच्या रूपात शिकवणीची अनुपम भेट प्रदान करतात. आपण श्रीगुरुमाईंकडून जे शिकलो आहोत, त्याचे हे एक सुंदर उदाहरण आहे : की, श्रीगुरू आणि शिष्य यांच्यामध्ये जे देणे आणि प्राप्त करणे होत असते, ते बहुआयामी असते. ते एकरेषीय नसते म्हणजे ते एकाच दिशेने घडत नाही; तर ते ३६० अंशात म्हणजे प्रत्येक बाजूने घडते. हे घेणे आणि देणे, हे आदानप्रदान जेव्हा घडत असते, तेव्हा त्याची शक्ती, त्याचे लाभ बाहेरच्या बाजूला, प्रत्येक दिशेला पसरत जातात, ते विस्तृत होत जातात, जे जगताला सौंदर्याने, साधूतेने, प्रकाशाने भरून टाकतात.

श्रीगुरुमाईंचे विद्यार्थी असण्याच्या नात्याने, त्यांच्याकडून मिळालेली ही भेट आपल्यासाठी अमूल्य आहे, कारण त्यांच्याद्वारे प्रदान केल्या गेलेल्या शिकवणीचे अध्ययन व अभ्यास आपल्याला अंतरामध्ये दिव्यतेच्या अनुभवापर्यंत घेऊन जातात. साधनेच्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी परिश्रमपूर्वक आणि दृढतापूर्वक आपल्या मार्गावर वाटचाल करीत राहणे, ही ती भेट आहे, जी *आपण* श्रीगुरूंना परत देऊ शकतो. आपल्याला अन्य रूपांमध्येही भेट देण्याची प्रेरणा मिळू शकते, जसे की, सेवा करणे आणि दक्षिणा अर्पित करणे यांच्याद्वारे—या दोन्हीही भेटी अशा आहेत की, ज्या श्रीगुरूंच्या शिकवणींच्या रूपांतरणकारी शक्तीविषयी सखोल समज आणि ज्ञान यांमधून उदित होतात.

आपल्याला श्रीगुरूंकडून जे काही प्राप्त होते, तो गुरुप्रसाद आहे—श्रीगुरूंनी प्रदान केलेला एक पावन उपहार. श्रीगुरूंनी प्रसाद देणे, हे अतुलनीय औदार्याचे आणि करुणेचे कृत्य आहे. श्रीगुरूंकडून मिळालेला प्रसाद म्हणजे श्रीगुरूंनी शिष्यावर वर्षाव केलेल्या कृपेचे रूप आहे. वस्तुतः, गुरुप्रसाद आणि गुरुकृपा हे समानार्थी आहेत.

गुरुप्रसाद ही एखादी भौतिक वस्तूच असावी, हे आवश्यक नाही. श्रीगुरूंकडून मिळालेला प्रसाद, कोणत्याही आकाराचा वा रूपाचा असो, तो शिष्याच्या साधनेमध्ये त्याचा कायापालट करतो. विचार करा, जेव्हा एका सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतरण होते, तेव्हा ते किती अद्भुत वाटते. जो कीटक एके काळी जमिनीवर सरपटत होता, संपूर्ण रूपबदलाच्या प्रक्रियेद्वारे त्याला पंख फुटतात आणि तो आकाशात झेप घेतो.

अतः, श्रीगुरुमाई आपल्याला एक अनमोल उपहार प्रदान करत आहेत : त्या एक सद्गुण प्रदान करत आहेत; ज्या समयी आपल्याला हा सद्गुण प्राप्त होतो आहे, त्या समयासाठी हा सद्गुण महत्त्वाचा आहे आणि याचे महत्त्व कालपरत्वे कित्येक पटीने वाढतच जाते. जे साधक या सद्गुणाचा अंगीकार

करतात, याचे अध्ययन करतात व याला आत्मसात करतात, त्यांच्यावर हा ज्या आशीर्वादांचा वर्षाव करतो, ते आशीर्वाद व याचे महत्त्व त्यांच्या साधनेत फलद्रूप होत राहते.

वर्ष २०२२मध्ये, श्रीगुरुमाईंनी त्यांच्या जन्मदिनाच्या सन्मानार्थ जो सद्‌गुण आपल्याला प्रदान केला आहे, तो आहे :

## समानुभूति

*[ऑडिओ रेकॉर्डिंग ऐकण्यासाठी इथे क्लिक करा]*

या क्षणी, आम्ही तुम्हाला आमंत्रित करतो की, तुम्ही हा शब्द, ‘समानुभूति’ मोठ्याने वाचावा.

मोठ्याने उच्चारत असताना ‘समा’मधील दीर्घ स्वर ‘आ’वर केंद्रण करा.

त्याबरोबरच ‘भूति’मधील दीर्घ स्वर ‘ऊ’वर केंद्रण करा.

आणि आता तुम्ही याला मनातल्या मनात पुन्हापुन्हा म्हणा—‘समानुभूति.’

***

या उत्कृष्ट सद्‌गुणासमवेत जास्त वेळ घालवण्यासाठी धन्यवाद. आम्हाला असे वाटते आहे की, तुमच्यापैकी अनेक लोकांची अशी इच्छा असावी की, आणखी अधिक वेळ घेऊन या सद्‌गुणाच्या सौंदर्याचा आदर करावा; याच्या रचनेची प्रशंसा करावी, आणि कदाचित, मानसिकरित्या याच्या आकारावरून स्वतःची बोटे फिरवावीत; याचा ध्वनी पुन्हापुन्हा ऐकावा, याच्या अक्षरांकडे आणि ऱ्हस्व व दीर्घ स्वरांकडे बारकाईने लक्ष द्यावे. असे करत असताना, तुम्ही याच्या स्वरूपाशी व याच्या वैशिष्ट्यांशी अधिकाधिक परिचित होत जाल आणि याच्यात निहित असलेल्या रसाचा आस्वाद घ्याल.

आमच्या आतापर्यंच्या अध्ययनामध्ये, आम्ही ‘समानुभूति’च्या अनेक पैलूंचा शोध लावला आहे. तथापि, कोणत्याही प्रकारे आमच्या म्हणण्याचे तात्पर्य हे नाही की, तुम्हाला ‘समानुभूति’मध्ये निहित केवळ हेच अर्थ सापडतील. ‘समानुभूति’चे प्रभामंडल, तिची व्याप्ती खूप विशाल आहे आणि ज्या प्रकारे ती प्रकट होते, ते रहस्यमय आहे. असंख्य पद्धतींद्वारे तिचे आकलन केले जाऊ शकते आणि तिचा अनुभव घेता येऊ शकतो. आम्हाला निश्चितपणे असे वाटते की, या सद्‌गुणाच्या तुमच्या अध्ययनाच्या दरम्यान, तुम्ही जेव्हा हा सद्‌गुण रात्रंदिवस तुमच्या चेतनेत धारण कराल आणि तुमच्या जीवनात तुम्ही जी पावले उचलता, त्यांमध्ये जेव्हा याला प्रतिबिंबीत होऊ द्याल, तेव्हा तुम्हाला ‘समानुभूति’च्या अर्थांविषयी

आणि आशीर्वादांविषयी तुमची स्वतःची आंतरिक समज प्राप्त होईल आणि याची रहस्ये तुमच्यासमोर उद्‌घाटित होतील. वस्तुतः, हा अजूनही, आमच्यासाठीदेखील एक प्रवासच आहे; आम्हीदेखील या सद्‌गुणाविषयी आमचा शोध चालू ठेवण्यासाठी उत्सुक आहोत—सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर अनुभवांचे वाचन करून, त्या लोकांशी संवाद साधून ज्यांचे विचार आणि रुची मिळतीजुळती असेल, तसेच जसजसे आम्ही स्वतः या प्रसादाशी संलग्न होऊ, तसतसा हा सद्‌गुण येत्या दिवसांमध्ये, आठवड्यांमध्ये आणि वर्षांमध्ये आमच्यासमोर काय-काय प्रकट करेल, हे जाणण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

***

तर मग, 'समानुभूति'चा अर्थ आहे तरी काय, असा शब्द जो संस्कृत आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये आढळतो? ठळकपणे पाहायचे झाल्यास, 'समानुभूति' हा शब्द इंग्रजी भाषेतील *empathy* [एम्पथि]शी खूपच मिळताजुळता शब्द आहे, ज्याची व्याख्या शब्दकोशात अशी केली गेली आहे की, आपल्यात दुसऱ्या व्यक्तीच्या भावना व मनोभाव अशा प्रकारे समजून घेण्याची किंवा अनुभवण्याची क्षमता असणे, की जणूकाही त्या भावना व मनोभाव आपले स्वतःचेच आहेत. इंग्रजीमध्ये त्याच्या पर्यायी शब्दांचे अर्थ आहेत, *समजूतदारपणा, घनिष्ठता, प्रशंसाभाव* आणि *करुणा.* त्याचबरोबर, 'समानुभूति'च्या अर्थांचे काही आणखी स्तर आहेत, ज्यांमुळे हा शब्द असामान्यपणे सखोल आणि समृद्ध होतो आणि तो एका झगमगत्या इंद्रधनुषी रत्नाप्रमाणे चमचमतो.

आम्ही आत्ताच सांगितल्यानुसार, 'समानुभूति' हा शब्द संस्कृत आणि हिंदी या दोन्ही भाषांचा शब्द आहे. दोन्ही भाषांमध्ये त्याचे अर्थ एकसमान आहेत आणि याचा उद्‌भव संस्कृत भाषेतून झाला आहे.

हा एक संयुक्त शब्द आहे, जो दोन भागांनी बनलेला आहे : 'सम' + 'अनुभूति.'

संस्कृत शब्द 'सम'चे अनेक अर्थ आहेत : *समान* किंवा *सदृश; एकसारखा, अगदी तसाच; संतुलित, तुल्य, समरूप; नित्य, अपरिवर्तनशील; निष्पक्ष, न्यायोचित;* आणि *पूरित, पूर्ण, समग्र.*

'अनुभूति'चा अर्थ आहे, अभिज्ञान, अनुभव, आंतरिक बोध आणि ज्ञान.

हे दोन शब्द जोडून जेव्हा एक संयुक्त शब्द तयार होतो 'समानुभूति,' तेव्हा त्याच्या अर्थांचे अनेक पैलू अभिव्यक्त होतात, जसे की :

- प्रत्येक व्यक्तीशी आणि वस्तूशी समानता, अभिन्नता तसेच ऐक्याची जाणीव होणे

- समग्रतेचे आणि पूर्णतेचे ज्ञान व बोध असणे
- संतुलनाचा आणि समस्थितीचा अनुभव
- समतेचा किंवा साम्य असण्याचा बोध जो सखोल समवेदना, करुणा व समजूतदारपणाचा भाव जागृत करतो
- इतरांचे मूल्यमापन न करता, त्यांच्याविषयी कोणतेही मत न बनवता त्यांना सौम्यतेने प्रतिक्रिया देणे

**'समानुभूति' म्हणजे समानतेची आणि ऐक्याची जाणीव होणे.**

'समानुभूति' तो सद्गुण आहे जो या मूलभूत विश्वासातून उद्भवतो, की प्रत्येक व्यक्ती व प्रत्येक वस्तू एकाच सारतत्त्वातून उगम पावते आणि म्हणून ती, अन्य प्रत्येक व्यक्तीसमान व वस्तूसमान आहे आणि तिच्याहून भिन्न नाही.

याच परमोच्च सत्याविषयी माण्डूक्य उपनिषदात म्हटले आहे :

> सर्वं ह्येतद् ब्रह्म अयमात्मा ब्रह्म
>
> हे सर्वकाही ब्रह्म आहे आणि हा आत्मा तेच ब्रह्म आहे.[१]

हा आत्मा जो ब्रह्म आहे, म्हणजे तोच आत्मा जो प्रत्येक व्यक्तीत आणि प्रत्येक वस्तूत व्याप्त आहे. तुम्ही नेहमीच या वस्तुस्थितीविषयी जागरूक जरी नसलात, तरी जर तुम्ही याविषयी विचार केलात, तर 'समानुभूति'मध्ये निहित असलेल्या ऐक्याचा अनुभव तुम्हाला बऱ्याचदा येतो. उदाहरणार्थ, कदाचित एखाद्या व्यक्तीला तुम्ही अगदी थोडा वेळ भेटला होतात, आणि नंतर तुमच्या कानावर येते की, त्या व्यक्तीचा तिच्या विशिष्ट क्षेत्रातील कार्यासाठी किंवा समाजातील तिच्या योगदानासाठी मोठा गौरव करण्यात आला. तेव्हा लगेचच तुम्ही प्रतिक्रिया असते, "अरे वा! फारच छान!" तुम्ही या व्यक्तीला नीट ओळखतदेखील नाही, तरीदेखील आता तिचा आनंद हा तुमचा आनंद बनतो, तिचे यश हे तुमचे यश बनते. तुम्हाला अभिमान वाटतो आणि तुम्ही त्या व्यक्तीशी स्नेहबंधाचा भाव अनुभवता. तुमच्या अंतरातील ब्रह्म त्या व्यक्तीच्या अंतरातील ब्रह्माशी एकलय आहे. तुम्ही त्या व्यक्तीला किती जास्त किंवा किती कमी ओळखता याच्याने काहीही फरक पडत नाही—तुम्हाला त्या व्यक्तीच्या अंतरी निहित ब्रह्मतत्त्वाच्या प्रकाशाची जाणीव तर झालेलीच असते.

आणखी एक उदाहरण पाहू या. एका प्रसन्न दिवशी, तुम्ही बरीच वर्दळ असलेल्या फुटपाथवरून चालत जात आहात. तुमच्यापुढे एक व्यक्ती चालते आहे. सर्वकाही ठीक आहे, आणि एकाएकी, तुमच्यापुढे

चालणारी व्यक्ती अडखळून खाली पडते. तुमची लगेचची प्रतिक्रिया असते की, तुम्ही तिला मदत करावी; तुम्ही त्या व्यक्तीजवळ जाता आणि हळुवारपणे त्या व्यक्तीला उठण्यासाठी मदद करता, तुम्ही पाहता की, त्या व्यक्तीला दुखापत तर झाली नाही ना. तुम्ही असा विचार करत नाही, "मी त्या व्यक्तीला मदत करू का? की नको करू?" तुम्ही विचारही न करता मदतीचा हात देऊ करता. तुमच्या अंतरातील ब्रह्मतत्त्वाला ते जाणवते, जे त्या व्यक्तीच्या अंतरातील ब्रह्मतत्त्व अनुभवत असते.

आपल्या सभोवती असणाऱ्या जगताशी नाते जोडण्याची आपल्यात जी क्षमता असते, तिचा बोध असणे म्हणजे 'समानुभूति' होय. आपल्यापैकी काही लोकांसाठी ही अशी भावना असते, जिचा कोणताही स्पष्ट रूपाकार किंवा गुण नसतो, एक अशी भावना जिचे वर्णन करणे किंवा जिची व्याख्या करणे आपल्यासाठी कठीण असते. तीच भावना 'समानुभूति' आहे.

**'समानुभूति' समग्रतेचे ज्ञान आहे.**

जगतासमवेत ऐक्यभाव ठेवल्याने, असा बोध बाळगल्याने की, असे काहीही नाही जे त्या परमोच्च 'मी'हून भिन्न आहे, तुम्ही हे पाहू लागता की, या ग्रहावरील सर्व प्राणिमात्र एकमेकांशी जोडलेले आहेत, ज्यामुळे एका सकल पूर्णतेची, एका समग्रतेची रचना होते, आणि हेच ब्रह्मांड आहे. पृथ्वीच्या एका भागात किंवा एखाद्या प्रजातीला जेव्हा काही होते, तेव्हा आज ना उद्या त्याचा प्रभाव उर्वरित संपूर्ण जगतावर आणि सर्व प्रजातींच्या जीवनावर नक्कीच होतो.

भौतिकशास्त्रातील एक सिद्धान्त 'क्वांटम संलिप्तता' [quantum entanglement] असे प्रतिपादन करतो की, अणूपेक्षाही लहान असलेले दोन मूलकण [म्हणजे सूक्ष्मकण किंवा सूक्ष्माणू] परस्परांशी जोडलेले असू शकतात, जरी वस्तुस्थिती ही असली की, त्यांच्यातील अंतर कोट्यवधी प्रकाशवर्षांमध्ये मोजता येऊ शकते. अनंत आकाशाचा विस्तार त्यांना जरी वेगळे करत असला, तरी जेव्हा एका मूलकणामध्ये बदल होतो, तेव्हा दुसऱ्या मूलकणावर त्याचा परिणाम होतो.

याखेरीज, परमाणू भौतिकशास्त्राच्या इतर सिद्धान्तांनी वर्णन केले आहे की, सूक्ष्मतम कण, परमाणू आणि अणू एकमेकांशी जोडलेले असतात. उदाहरणार्थ, एखाद्या परमाणूतील भारित कण [charged particles] एकमेकांशी बांधले गेलेले असतात, आणि इतकेच नव्हे तर, या बंधनाने जर त्या कणांना एकमेकांशी बांधून ठेवले नाही, तर त्या परमाणूंचे काही अस्तित्वच राहणार नाही. इथेदेखील आपण पाहू शकतो की, एका कणामध्ये जेव्हा बदल होतो तेव्हा दुसऱ्या कणावर त्याचा परिणाम होतो.

ग्रहमालेविषयीच्या संशोधकांनी असा शोधदेखील लावला आहे की, मानवाच्या शरीरात असलेली जवळजवळ सर्व रासायनिक मूलद्रव्ये, जसे की, कॅल्शियम, सोडियम, आयर्न [लोहतत्त्व], कॉपर [तांबे], हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांच्या मूळ स्त्रोतांच्या खुणा आपल्याला दूरवरील नक्षत्रांवर सापडू शकतात. युगानुयुगे विभिन्न नवताऱ्यांचा [सुपरनोवा] विस्फोट झाल्यावर ही मूलद्रव्ये आपल्या सूर्यमालेमध्ये पोहोचली, पृथ्वीवर आली आणि कालांतराने आपल्या शरीरांमध्येही आली. अशा प्रकारे, आपण या ब्रह्मांडाचा भाग आहोत आणि ब्रह्मांड, अगदी शब्दशः, आपलाच एक भाग आहे.

विज्ञान सांगते की सर्वकाही ऊर्जेने स्पंदित होते आहे—परमाणू स्तरावर, आण्विक स्तरावर, सजीव प्राण्यांच्या स्तरावरदेखील. आणि प्रत्येक गोष्ट तिच्या स्वतःच्या विशिष्ट कंपनांसह स्पंदित होते. दोन गोष्टी जेव्हा एकमेकांसह कंपायमान होतात, तेव्हा त्यांच्यात ऊर्जेचे आदानप्रदान होते. ही ऊर्जा जी संपूर्ण ब्रह्मांडात—प्रत्येक अणू-परमाणूत—स्पंदित होते, ती एका परस्पर सामंजस्याची, अनुरूपतेची रचना करते.

'अणु' हा एक संस्कृत शब्द आहे. 'अणु' हे भगवान शिवाचेदेखील एक नाव आहे ज्याचा अर्थ आहे 'जीवात्मा.' परम शिव प्रत्येक जीवात्म्याचे रूप धारण करतात आणि या जगतात सर्वकाही बनण्यासाठी स्वतः संकोचदेखील पावतात आणि स्वतःच अनेकही बनतात. किती दिव्य संकल्पना आहे ही! तुम्ही हिच्याशी सहमत आहात ना?

तुम्हाला जेव्हा या ब्रह्मांडीय परस्परसंबंधाचे, या परस्परजोडणीचे, सार्वभौमिक स्तरावर गोष्टी परस्परांवर अवलंबून आहेत याचे आकलन होते आणि तुम्ही एकत्वाच्या ज्ञानामध्ये हळूहळू जेव्हा अवस्थित होऊ लागता, तेव्हा तुम्ही केवळ स्वतःच्या अंतरीच सामंजस्याच्या स्थितीत जगू लागत नाही, तर तुम्ही या विश्वातील सर्व प्राण्यांसमवेतदेखील परस्पर सामंजस्यासह राहू लागता.

दुसऱ्या बाजूला, तुम्ही स्वतःला इतरांपासून, तुमच्या आजूबाजूच्या वातावरणापासून आणि या जगतापासून वेगळे समजता, तेव्हा हा संकुचित दृष्टिकोन अंतरीदेखील आणि बाहेरदेखील विसंगतीला आणि असामंजस्याला जन्म देतो आणि यामुळे ब्रह्मांडीय व्यवस्था भंग पावते, ती विस्कळीत होते.

यावरून आम्हाला गुरुमाईंचे श्रीगुरू, बाबा मुक्तानंदांच्या एका शिकवणीचे स्मरण होते आहे. बाबा हिंदी आणि मराठीच्या संमिश्र आणि अत्यंत प्रेमळ भाषेमध्ये नेहमी सांगत असत :

उपकार नको मगर उपद्रव नहीं चाहिए

> तुम्ही जर कोणावर उपकार करू शकत नसाल, कोणाला मदद करू शकत नसाल, तर किमान उपद्रवी बनू नका.

बाबा बहुधा संक्षिप्त व सारगर्भित रूपात, सूत्रवाक्यांमध्ये बोलत असत, ज्यांमध्ये गूढ अर्थ निहित असत. या कथनामध्ये, ते म्हणत आहेत, "मार्गात येऊ नका, जे मदत करायचा प्रयत्न करत आहेत त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण करू नका." बाबांचे हे शब्द आपल्यासाठी हा अर्थदेखील प्रकट करतात की, आपल्याला या ब्रह्मांडीय व्यवस्थेमध्ये सामंजस्याचे वाहक बनण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

बाबांच्या शब्दांमध्ये निहित असलेले प्रज्ञान आत्मसात करून, तुम्ही तुमच्या जगतात आणि त्यापलीकडेदेखील सामंजस्याची पुनःस्थापना कशा प्रकारे कराल? असे करण्याचा एक मार्ग आहे, 'समानुभूति' या सद्गुणाशी जोडले जाणे आणि जगताला एकत्र गुंफलेल्या एका समग्रतेच्या रूपात पाहून या सद्गुणाचा अभ्यास करणे. 'समानुभूति'चा अभ्यास करण्यासाठी जागरूकतेसह प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

*क्रमशः...*

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] माण्डूक्य उपनिषद्, २; इंग्रजी भाषांतर © २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन.